पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अधिनस्त विविध कार्यालयातील १,३३० अस्थायी पदांना मुदतवाढ देण्याबाबत

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांक : टिआरए-१२१७/१७८२/प्र.क्र.३५६/पोल-८
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक : १७ जानेवारी, २०१८

संदर्भ : १) गृह विभाग, शासन निर्णय क्रमांकः टिआरए-१०१७/१३९२/प्र.क्र.२६७/पोल-८, दि. १८.१०.२०१७

२) पोलीस महासंचालक कार्यालय, म.रा. यांचे पत्र क्रमांक पोमसं/२६-ब/६१४३/१३३१ पदे मुदतवाढ/५९/२०१६, दिनांक १४.१२.२०१७

शासन निर्णय

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अधिनस्त कार्यालयातील विविध १,३३१ अस्थायी पदांना, गृह विभागाच्या संदर्भाधीन शासन निर्णयान्वये दिनांक ३१ डिसेंबर, २०१७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली होती.

२. पोलीस महासंचालक कार्यालयामार्फत उपरोक्त पदांपैकी १३३० अस्थायी पदांना पुढील मुदतवाढ देण्याबाबतचा प्रस्ताव शासनास प्राप्त झालेला आहे. शासन निर्णय, गृह विभाग क्रमांक एमआयएस-०१०४/प्र.क्र.७७/१/पोल-८, दिनांक १२.०७.२००४ च्या शासन निर्णयान्वये पोलीस आयुक्त, नागपूर यांच्या आस्थापनेवर विविध पदांसह पोलीस उपनिरीक्षकांची दोन पदे निर्माण करण्यांत आली होती. त्यापैकी पोलीस उपनिरीक्षकाचे एक पद शासन निर्णय, गृह विभाग क्रमांक अेपीओ-३६१६/प्र.क्र.८८/पोल-३, दिनांक ९ जानेवारी, २०१७ अन्वये स्थापत्य कनिष्ठ अभियंता पदाकरीता पोलीस आयुक्त, नागपूर या घटक कार्यालयाकडे स्थलांतरीत करण्यात आलेले आहे. त्यामुळे पोलीस आयुक्त, नागपूर शहर यांचे आस्थापनेवरील एकूण ४४४ अस्थायी पदांपैकी पोलीस उपनिरीक्षक हे पद कमी करुन आता पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांच्या अधिनस्त घटक कार्यालयांच्या आस्थापनेवरील पुर्वीच्या एकूण १३३१ पदांऐवजी पुढे दर्शविल्याप्रमाणे १३३० अस्थायी पदांना मुदतवाढ देण्याची विनंती पोलीस महासंचालक कार्यालयाने केलेली आहे.

अ. क्र.	घटक कार्यालयाचे नाव	पदनाम	पद संख्या	पदनिर्मिती केलेला शासन निर्णय	मागील मुदतवाढ दिलेला शासन निर्णय क्रमांक व दिनांक
१	पोलीस अधीक्षक, चंद्रपूर **एकूण पदे ४४**	पो.उ.नि. पो.ह. पो.शि. चा.पो.शि.	१ १० ३१ २	टिआरए-१२९१/३०९१/४/पोल-८, दि. २६.०६.१९९२	टिआरए-१०१७/१३९२/प्र.क्र. २६७/ पोल-८, दि. १८.१०.२०१७

२	पोलीस अधीक्षक, लातूर **एकूण पदे १८**	पो.उ.नि. पो.ह. पो.शि.	१ ३ १४	टिआरए-०४९९/सीआर-१२३/ पोल-८, दि. २०.०९.२०००	टिआरए-१०१७/१३९२/प्र.क्र. २६७/ पोल-८, दि. १८.१०.२०१७
३	पोलीस अधीक्षक, अहमदनगर **एकूण पदे ६०**	पो.नि. पो.उ.नि. स.पो.उ.नि. पो.ह. पो.शि.	१ २ ४ १० ४३	टिआरए १४९१/१३/ पोल-८, दि.२४.०६.१९९२	टिआरए-१०१७/१३९२/प्र.क्र. २६७/ पोल-८, दि. १८.१०.२०१७
४	पोलीस अधीक्षक, जळगांव **एकूण पदे ७२**	पो.उ.नि. पो.ह. पो.शि. चा.पो.शि.	१ १६ ५२ ३	टिआरए-०२९६/१५/ पोल-८, दि. ९.०८.१९९६	टिआरए-१०१७/१३९२/प्र.क्र. २६७/ पोल-८, दि. १८.१०.२०१७
५	पोलीस आयुक्त, ठाणे (शहर) **एकूण पदे १९४**	पो.उ.नि. स.पो.उ.नि. पो.ह. पो.शि.	५ १२ ३८ १३९	एमआयएस-०१०४/प्र.क्र.७७/१/ पोल-८, दि. १२.०७.२००४	टिआरए-१०१७/१३९२/प्र.क्र. २६७/ पोल-८, दि. १८.१०.२०१७
६	पोलीस आयुक्त, औरंगाबाद **एकूण पदे ३०**	पो.ह. पो.शि.	१० २०	एमआयएस-०१०४/७७/१/पोल-८, दि. १२.०७.२००४	टिआरए-१०१७/१३९२/प्र.क्र. २६७/ पोल-८, दि. १८.१०.२०१७
७	पोलीस आयुक्त, अमरावती **एकूण पदे ९५**	पो.ह. पो.शि. चा.पो.शि. पो.उ.नि. पो.ह. पो.शि.	५ २७ १ १ १९ ४२	१) टिआरए-०२९६/१६/पोल-८, दि. १४.०८.१९९६ २) टिआरए-०२९६/१६/पोल-८, दि.१४.०८.१९९६ अन्वये २८ पदे मंजूर करण्यात आली होती. तथापि, शा.नि.क्र. रापोसे/०५/२००१/प्र.क्र.१६२/पोल-१-अ, दिनांक ६.०१.२००६ अन्वये सहायक पोलीस आयुक्त पदात श्रेणी वाढ झाल्याने पो.शि. चे एक पद कमी करण्यात आले. त्यानुसार पो.शि. ची २७ पदे शिल्लक राहिली. ३) टिआरए-०२९६/१६/पोल-८, दि. १४.०८.१९९६ ४) एमआयएस-०१०४/प्र.क्र.७७/२/पोल-८, दि. १२.०७.२००४	टिआरए-१०१७/१३९२/प्र.क्र. २६७/ पोल-८, दि. १८.१०.२०१७

८	पोलीस आयुक्त, नवी मुंबई **एकूण पदे १३९**	पो.उ.नि. स.पो.उ.नि. पो.ह. पो.शि.	३ २ ४० ९४	एमआयएस-०१०४/ प्र.क्र.७७/ १/पोल-८, दि. १२.०७.२००४	टिआरए-१०१७/१३९२/प्र.क्र. २६७/ पोल-८, दि. १८.१०.२०१७
९	पोलीस आयुक्त, सोलापूर **एकूण पदे ५७**	पो.उ.नि. पो.ह. पो.शि.	७ १२ ३८	टिआरए-१००५/प्र.क्र.९/१/पोल-८, दि. १२.०७.२००४	टिआरए-१०१७/१३९२/प्र.क्र. २६७/ पोल-८, दि. १८.१०.२०१७
१०	पोलीस आयुक्त, नागपूर **एकूण पदे ४४३**	पो.उ.नि. पो.ह. पो.शि.	१ १४४ २९८	१) एमआयएस-०१०४/ प्र.क्र. ७७/ १/पोल-८, दि. १२.०७.२००४ २) अेपीओ-३६१६/प्र.क्र. ८८/ पोल-३, दि. ९.०१.२०१७ अन्वये पो.उ.नि. च्या २ पैकी १ पद स्थानांतरीत केले	टिआरए-१०१७/१३९२/प्र.क्र. २६७/ पोल-८, दि. १८.१०.२०१७
११	पोलीस आयुक्त, पुणे **एकूण पदे १०८**	पो.उपायुक्त पो.शि.चा. पो.शि.सु. उ.श्रे.ल.ले. क.श्रे.लि. चपराशी पो.उ.नि. पो.ह. पो.शि.	१ १ १ १ १ १ २ ३० ७०	१) एपीओ-०९९३/प्र.क्र.२४५/ पोल-३, दि. ३.०१.१९९४ अन्वये एक पद शासनास प्रत्यर्पित केले. २) टिआरए-०१८६/२७५३/२/ पोल-८, दि. २३.०९.१९८८ ३) एमआयएस-०१०४/प्र.क्र. ७७/१/ पोल-८, दि. १२.०७.२००४	टिआरए-१०१७/१३९२/प्र.क्र. २६७/ पोल-८, दि. १८.१०.२०१७
१२	पोलीस आयुक्त, नाशिक **एकूण पदे ७०**	पो.उ.नि. पो.ह. पो.शि.	२ २० ४८	एमआयएस ०१०४/प्र.क्र.७७/१/ पोल-८, दि. २८.०७.२००४	टिआरए-१०१७/१३९२/प्र.क्र. २६७/ पोल-८, दि. १८.१०.२०१७
	एकूण पदे		**१,३३०**		

३. उपरोक्त पदे ज्या परिस्थिती निर्माण करण्यांत आली होती ती परिस्थिती अद्यापि कायम असल्याचे पोलीस महासंचालक कार्यालयाने स्पष्ट केले आहे. त्यास अनुसरुन आता पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या अधिनस्त विविध कार्यालयातील उपरोक्त तक्त्यानुसार (पोलीस आयुक्त, नागपूर यांचे आस्थापनेवरील पोलीस उपनिरीक्षक हे एक पद वगळून) एकूण १,३३० अस्थायी पदांना **दिनांक १ जानेवारी, २०१८ पासुन दिनांक २८ फेब्रुवारी, २०१८** पर्यंत खालील अटींच्या अधीन राहून मुदतवाढ देण्यास या निर्णयाद्वारे शासन मंजुरी देत आहे.

१. सहा महिन्यांपेक्षा अधिक काळ रिक्त असलेल्या अस्थायी पदांना (कार्यकारी पदे वगळून) ही मुदतवाढ लागू असणार नाही.
२. अस्थायी पदे ज्या कारणास्तव, ज्या अटी व शर्तींच्या अधीन राहून मंजूर केली आहेत, त्यांचे पालन करण्यात यावे.
३. शासन निर्णय, वित्त विभाग, क्रमांक : असंक-१००१/प्र.क्र.२९/२००१/वित्तिय सुधारणा-१, दिनांक १० सप्टेंबर, २००१, क्रमांक : असंक-१००४/प्र.क्र.१२/२००४/वित्तिय सुधारणा-१, दिनांक १९ ऑगस्ट, २००४, क्रमांक : पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/वित्तीय सुधारणा-१, दिनांक २१ सप्टेंबर, २०१६ व क्रमांक पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क., दिनांक १० फेब्रुवारी, २०१७ व दिनांक ०३.१०.२०१७ नुसार पदांच्या आढाव्याची कार्यवाही तातडीने पूर्ण करुन कार्यालयाच्या सुधारीत आकृतीबंधास पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई यांनी उच्चस्तरीय समितीची अंतिमत: मान्यता प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही कोणत्याही परिस्थितीत दिनांक २८ फेब्रुवारी, २०१७ अखेरपर्यंत प्राप्त करुन घेणे आवश्यक आहे. त्याकरीताचा प्रस्ताव शासनास तात्काळ सादर करावा.

४. दिनांक २८ फेब्रुवारी, २०१८ पर्यंत पदांच्या आढाव्याची कार्यवाही पूर्ण न झाल्यास, वरील अस्थायी पदांना त्या पुढील कालावधीसाठी मुदतवाढ न मिळाल्यास व त्यामुळे अधिकारी/ कर्मचारी यांच्या वेतन व भत्त्याचा प्रश्न निर्माण झाल्यास ती संबंधित कार्यालयाची जबाबदारी राहील.

५. यासाठी होणारा खर्च गृह विभाग, मागणी क्रमांक : बी-१, "२०५५ पोलीस-१०९ जिल्हा पोलीस-१०९ (००) (०१) जिल्हा पोलीस दल" या लेखाशिर्षाखालील सन २०१७-२०१८ या वर्षीच्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा व हा खर्च त्याच लेखाशिर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा.

६. प्रस्तुतचे आदेश, शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क., दिनांक ०८.०१.२०१८ अन्वये प्रशासकीय विभागास प्रदान करण्यात आलेल्या अधिकारानुसार निर्गमित करण्यात येत आहे.

७. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०११७१८१०५५००२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Sudhakar D. Pawar

Digitally signed by Sudhakar D. Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=2c1ebd27661971090dc2c91d4bb9caabd4da394aa85829a09265097faf097ba5, cn=Sudhakar D. Pawar
Date: 2018.01.17 18:14:53 +05'30'

(सु. धों. पवार)
अवर सचिव, गृह विभाग

प्रत,

१. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. अप्पर पोलीस महासंचालक (वाहतुक), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
३. महालेखापाल-१ (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई
४. महालेखापाल-१ (लेखा परिक्षा), मुंबई
५. महालेखापाल-२ (लेखा व अनुज्ञेयता), नागपूर
६. महालेखापाल-२ (लेखा परिक्षा), नागपूर
७. जिल्हा कोषागार अधिकारी, नागपूर / चंद्रपूर / अमरावती / औरंगाबाद / लातूर / नाशिक / अहमदनगर /जळगांव/ठाणे / रायगड / पुणे / सोलापूर
८. पोलीस आयुक्त, नागपूर / अमरावती / ठाणे / नवी मुंबई / नाशिक / औरंगाबाद / पुणे / सोलापूर
९. पोलीस अधीक्षक, चंद्रपूर / लातूर / अहमदनगर / जळगांव
१०.कार्यासन (व्यय-७), वित्त विभाग, मंत्रालय,मुंबई
११.कार्यासन (आ.पु.क.) वित्त विभाग, मंत्रालय,मुंबई
१२.कार्यासन (पोल-३), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
१३.निवडनस्ती (पोल-८)